# कागदो पत्री कॉलेज

शैक्षणिक क्षेत्रात काम करता करता मी अशा एका मुक्कामावर येऊन पोचले की एक दिवस एक महाविद्यालयच काढायचं ठरवलं व अनेक गमतीदार गोष्टींना सामोरं जावं लागलं, कॉलेजच काढायचं! म्हटलं जाणकार व्यक्तीचा सल्ला घ्यावा. त्यांना माझा मनोदय सांगितला: अन् आमच्या प्रश्नोत्तरांच्याच फैरी झडू लागल्या.

जाणकार व्यक्तींनी सांगितलं तुम्ही खासदार, आमदार असाल तर तुम्ही कॉलेज काढू शकता असा सरकारने नियमच केला आहे. माझा प्रश्न ' असा नियम का?' कारण सरकारी जमीन मिळवतानाच सरकारशी साटलोट कराव लागतं, म्हणजे काय? म्हणजे सरकारला टेबलाखालून व तितकाच वरून पैसा द्यावा लागतो. मगच सरकारी जमीन मिळते आणि ते सामान्य नागरिकाला शक्य नाही, म्हणून असा नियम. 'मग मी ठरवलं, असा नियम असेल तर आधी खासदार व्हायला हवं. अहो, साधं वर्गात मॉनिटर होणं मला जमलं नाही मग एवढा लांबचा पल्ला गाठणं मला अशक्य होतं.

जाणकार व्यक्ती म्हणाली, 'नियम नंबर दोन, महाविद्यालय चालवताना, कागदावर दाखवायला व प्रत्यक्ष शिकवायला अशा दोन सेट्समध्ये प्राध्यापक वर्ग लागेल.जमेल का ? शोध घ्यायचं ठरवल व सपशेल माघार घ्यावी लागली. अहो प्राचार्य व प्राध्यापकांचा अनुभव असलेल्या लोकांनी बोली लाखांच्या घरात लावली होती. अन प्रत्यक्षात शिकवणारे लोक खूप दुर्मिळ होते. का ? तर दोन्ही वरील कडक नियमांमुळे प्राध्यापक घडवण्याचं काम बंद पडलं होत.

जाणाकर व्यक्ती म्हणाली, प्राचार्य, प्राध्यापकांच्या नेमणुका, कॉलेजची परवानगी मिळवण्याच्या वर्षभर आधी कराव्या लागतात. म्हंटल ठीक आहे. पण वर्षभर आधी ते काम काय करणार ? जाणकार व्यक्ती चिडलीच की हो'. अहो नंतर तरी ते काय करतात? म्हटलं, खरंच खरंय, जेव्हा सहावा वेतन आयोग लागू करण्याचं ठरवलं तेव्हाच सर्व प्राध्यापकाकडून, आम्ही कधीच काही शिकवणार नाही असा करारच करून घेतला आहे. जाणकार म्हणाले, सरकारला तसा करार

करून घेणे भागच होत. नाहीतर प्रत्येक कॉलेजला वर्षभर ८ ते १० इन्स्पेक्शनला तोंड द्यावं लागतं.

मग प्राध्यापकांकडून शिकवण्याचं पण काम करून घेण म्हणजे त्यांच्यावार जास्तीचा बोझाच नव्हे का ? म्हणून सरकार व प्राध्यपकांनी वाटाघाटी करून यावर तोडगा काढला व कराराच्या प्रस्तावाला मान्यता दिली. कारण यात दोघांचंही भलंच होतं. वरून जाणकारांनी आणि स्पष्टीकरण दिलं, मनपा शिक्षक नाही का, निवडणुकांचं काम स्वेच्छेने करत ? मग प्राध्यापकांनाच तेवढी सूट का? त्यांनासुध्दा वर्कलोड हवंच: आणि म्हणूनच एवढे इन्स्पेक्शन. मी मान डोलावली, ठीक आहे.

जाणकार पुढे म्हणाले ‘ सरकारने विचार केला असावा, प्राध्यापकांना शिकवणं सक्तीचं केल असतं तर शासनाची पंचाईत झाली असती. कारण महाविद्यालयांना मुलं व प्राध्यापक दोन्ही मिळवणं कठीण झालं आहे. तेव्हा दोघांनी पण तेरी भी चूप, मेरीभी चूप करायच ठरवलं.

मीच जरा अडाणीपणे माझी शंका पुढे विचारली, पण मग कॉलेज फक्त कागदोपत्रीच काढायला काय हरकत आहे ? जाणकारानी माझ्याकडे कसं या बाईला काहीच कळत नाही असा एक कटाक्ष टाकला व हार खाऊन स्वत:च खुलासा केला. ‘‘ जरा चौकस नजर ठेवा, असेच सुरू आहे सगळीकडे आणि हेच तर मी मघापासून तुम्हाला समजावून सांगतो आहे.

मी कानच पकडले, चुकलं माझं.

सकाळ – २० सप्टेंबर २०११